# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ
## विद्यार्थी विकास विभाग

दूरध्वनी : २६६०९४७,८६००२८५८५७ Website:www.sgbau.ac.in/Student Development/Letter Email:directorsd@sgbau.ac.in

क्र.संगाबाअवि/१३-विवि/४८/२०२३
दिनांक : १०/०३/२०२३

प्रति,
मा.प्राचार्य,
सर्व संबंधित महाविद्यालये,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,
अमरावती.

**विषय : सत्र २०२२-२०२३ करीता ए.आय.यु.नवी दिल्ली यांचे द्वारे आयोजित प्रथम राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद करीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद चमु पाठविण्याबाबत.**
**संदर्भ :** या विभागाचे पत्र क्रमांक क्र.संगाबाअवि/१३-विवि/४१/२०२३ दिनांक ०२.०३.२०२३

**महोदय,**

उपरोक्त संदर्भाकीत विषयाचे अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, सत्र २०२२-२०२३ मध्ये ए.आय.यु.नवी दिल्ली यांचे द्वारे भारतीय विद्यार्थीनींना सक्षम करण्यासाठी शिक्षण क्षेत्र व त्यातील अडथळे आणि त्याचे समाधानकारक उपाय समजून घेवून देशाच्या सर्वागिण विकासाची वाढ होण्याच्या दृष्टीकोणातून प्रथम राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद डॉ.हरिसिंग गौर विद्यापीठ, सागर येथे दिनांक १४ ते १६ मार्च, २०२३ या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे.

ए.आय.यु.नवी दिल्ली यांचे द्वारे आयोजित होणा-या प्रथम राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधीत्व करण्यासाठी सोबत जोडलेल्या यादीतील स्पर्धक/कलावंत यांची ए.आय.यु. नवि दिल्ली यांचे पात्रता नियमांचे अधिन राहून प्रथम महिला विद्यार्थी संसद करीता तात्पुरती निवड करण्यात आली आहे.

या संसदेकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद **चमुचा प्रशिक्षण वर्ग** स्वामी विवेकांनद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, विद्यापीठ परिसर, अमरावती येथे **दिनांक ११ मार्च २०२३ रोजी** विद्यापीठ विनियम क्र. १२/२०१९ चे अधिन राहुन आयोजित करण्यात येणार आहे.

प्रशिक्षण वर्ग आयोजनार्थ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद चमूतील स्पर्धक कलावंत व चमू व्यवस्थापक यांची सभा **स्वामी विवेकांनद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, विद्यापीठ परिसर, अमरावती येथे दिनांक ११ मार्च, २०२३ रोजी दुपारी १२.०० वाजता** आयोजित करण्यात येत आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद स्पर्धेतील चमूतील स्पर्धक, कलावंत व चमू व्यवस्थापक यांनी नमूद तारखेस व वेळेवर डॉ. राजीव बोरकर, संचालक विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेशी स्वामी विवेकांनद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, विद्यापीठ परिसर, अमरावती येथे संपर्क साधावा.

स्पर्धक, कलावंत व चमू व्यवस्थापक यांनी प्रशिक्षण वर्गास येतांना **एस.एस.सी., एच.एस.एस.सी./समकक्ष परीक्षा बोर्ड प्रमाणपत्रांचे प्रत्येकी ४ साक्षांकित प्रती, महाविद्यालयाचे ओळखपत्र, भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाचे आधार कार्ड, बँक पासबुक पत्राची छायांकित प्रत, महाविद्यालयात प्रवेश घेतल्याबाबत शुल्क पावती, ०५ पासपोर्ट व ०५ स्टॅम्प साईज आकाराचे छायाचित्र सोबत आणणे अत्यंत आवश्यक आहे. त्याशिवाय प्रशिक्षण वर्गात समावेश करण्यात येणार नाही,** याची कृपया प्रकर्षाने नोंद घ्यावी.

प्रशिक्षण वर्ग कालावधीकरीता स्पर्धकाचा प्रवास खर्च, निवास व भोजन व्यवस्था संबंधित महाविद्यालयांना करावी लागेल. स्पर्धकांचे प्रवास भत्ता देयक या कार्यालयास सादर केल्यानंतर विद्यापीठ नियमानुसार प्रवास खर्च देय राहील.

आपणास विनंती की, आपल्या महाविद्यालयातील संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद स्पर्धेतील चमूमध्ये निवड झालेल्या स्पर्धक कलावंत यांना प्रशिक्षण वर्गाकरीता नमूद तारखेस व वेळेवर **डॉ. राजीव बोरकर, संचालक विद्यार्थी विकास, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचेशी स्वामी विवेकांनद विद्यार्थी भवन, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, विद्यापीठ परिसर, अमरावती** येथे संपर्क साधण्याकरीता सुचना देण्यात यावी ही विनंती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ महिला विद्यार्थी संसद चमू **प्रथम राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद स्पर्धेत डॉ. हरिसिंग गौर विद्यापीठ, सागर (मध्य प्रदेश)** येथे सहभागी होण्याकरीता अमरावती येथून दिनांक १३ मार्च, २०२३ रोजी रवाना होईल कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

**सत्र २०२२-२०२३ करीता विद्यापीठ प्रथम राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद चमू मध्ये**
**तात्पुरती निवड झालेल्या स्पर्धक व्यवस्थापक यांची यादी**

| अ.क्र. | विद्यार्थीनींचे नांव | महाविद्यालयाचे नांव |
|---|---|---|
| ०१. | कु. आकांशा अविनाश असनारे | १३०-डॉ. पंजाबराव देशमुख लॉ कॉलेज, अमरावती. |
| ०२. | कु. श्रेया मनिष शेळके | १६८-सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अमरावती. |
| ०३. | कु. सकिना अली | २१२-कॉलेज ऑफ इंजिनिआरिग अॅन्ड टेक्नॉलॉजी, अकोला |
| | **राखीव** | |
| ०१. | कु. नफिसा शब्बीर हुसैन | ८४९-इन्स्टिट्युट ऑफ फार्मसी ॲन्ड रिसर्च, बडनेरा. |
| ०२. | कु. सानुबर तसकीन खान | १२६-विद्याभारती महाविद्यालय, अमरावती. |
| | **चमू व्यवस्थापक** | |
| ०१. | डॉ. संतोष गोरे | ४१२-लोकनायक बापुजी अणे महिला महाविद्यालय, यवतमाळ. |
| ०२. | डॉ. अंजु फुलझेले | ४०१-अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ. |

आपला विश्वासू,

**(डॉ.राजीव बोरकर)**
संचालक,
विद्यार्थी विकास,
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रतिलिपी :**

०१. मा.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
०२. प्र.कुलगुरु, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
०३. कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
०४. वित्त व लेखा अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती.
०५. जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त प्रशिक्षण वर्गाची माहिती व चमूमध्ये निवड झालेल्या स्पर्धक, कलावंत यांची सोबत जोडण्यात आलेली यादी स्थानिक तथा प्रादेशिक वर्तमान पत्रांमध्ये शिघ्रातिशिघ्र प्रकाशीत करावी.
०६. संबंधित चमू व्यवस्थापक, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ प्रथम राष्ट्रीय महिला विद्यार्थी संसद चमू.